किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● सर्वेक्षण

■अंतरंग उद्योगी महाराष्ट्राचे

५● एक दृष्टिक्षेप औद्योगिक महाराष्ट्रावर...

११● औद्योगिक बदलांचे प्रवाह - अंतःप्रवाह

१७● औद्योगिकरण आणि शहरीकरण

■मरणात जग जगते...

२२● मरण कल्पनेशी सुरू तर्क....

२७● ....अर्क कायद्याचा

३३● सन्मानपूर्वक मरण्याचा हक्क



**खंड १३ : अंक ९** **डिसेंबर २०१४**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



वार्षिक वर्गणी १००/- रुपये **(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १३ (अंक ९) डिसेंबर २०१४**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# सर्वेक्षण

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे संस्थापक आणि आपल्या देशातील एक अग्रगण्य अर्थवेत्ते वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक राष्ट्रीय चर्चासत्र दरवर्षी आयोजित करण्याचा संस्थेचा गेल्या अनेक वर्षांचा परिपाठ आहे. त्यानुसार, ७ व ८ नोव्हेंबर २०१४ असे दोन दिवस संस्थेच्या पुण्यातील वास्तूमध्ये यंदाचे चर्चासत्र पार पडले. महाराष्ट्रातील नाशिक आणि जालना या दोन जिल्ह्यांमधील उद्योगविश्वात साधारणपणे १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून जे काही लक्षवेधी बदल साकारताना दिसतात त्यांचा अधिक तपशीलाने अभ्यास करण्याचा एक छोटासा प्रयत्न संस्थेने अलीकडील दोन-तीन वर्षांपासून हाती घेतलेला आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक विश्वासंदर्भात अधिकृत सरकारी स्त्रोतांद्वारे वेळोवेळी प्रकाशित केल्या जाणा-या जिल्हानिहाय अधिकृत आकडेवारीचे विश्लेषण आणि त्या विश्लेषणाद्वारे निष्पन्न होणा-या काही वेधक पैलूंवर प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधनाद्वारे अधिक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न, असे या अभ्यासप्रकल्पाचे सारस्वरूप आहे. सामाजिक शास्त्रांच्या प्रांतातील कोणत्याही गंभीर अध्ययन-परीक्षणाची सर्वसाधारण पद्धती अशीच असते. क्षेत्रीय संशोधनाद्वारे माहिती व आकडेवारी गोळा करणे ही नेहेमीच विलक्षण खर्चिक बाब ठरते. त्यांमुळे सामाजिक शास्त्रांच्या अंगोपांगांत रस असणारे संशोधक-अभ्यासक अधिककरून प्रकाशित माहितीच्या विश्लेषणावरच लक्ष केंद्रित करत असतात. प्रकाशित आकडेवारीच्या अभ्यासावरून भवतालच्या गतिमान वास्तवातील ज्या घटितांचा पुरेसा उलगडा होऊ शकत नाही अशा बाबींचे आकलन करून घेण्यासाठी अतिशय नेमके असे क्षेत्रीय संशोधन हाती घेतले जाते. उपलब्ध असलेल्या प्रकाशित सांख्यिकीच्या प्रकाशात बदलत्या वास्तवाचे प्रवाह जोखणे आणि त्या दृष्य प्रवाहाच्या पृष्ठभागाखाली सक्रिय असणा-या अदृश्य अंतःप्रवाहांचे निरीक्षण क्षेत्रीय पाहणीद्वारे करणे, अशी अभ्यासपद्धती बहुतेक वेळा अवलंबली जाते. प्रकाशित आकडेवारीचे विश्लेषण आणि क्षेत्रीय सर्वेक्षण या दोन्ही बाबी एकमेकींना पूरक असतात. सामाजिक वास्तवाबाबतचे आपले आकलन अशा प्रक्रियेमधूनच प्रगल्भ बनत राहते.



महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्हयात कार्यरत असलेल्या उद्योगविश्वात साकारत असलेल्या बदलांचा मागोवा प्रकाशित आकडेवारीच्या माध्यमातून घेण्याचा एक उपक्रम भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीशी संलग्न असलेल्या एक संशोधिका डॉ. शरदिनी रथ सध्या करत आहेत. केंद्र सरकारच्या सांख्यिकी संकलन संघटनेच्यावतीने वेळोवेळी केल्या जाणा-या आर्थिक गणनांद्वारे हाती येणारी सांख्यिकी तसेच राज्याराज्यांत कार्यरत असणा-या कारखान्यांसंदर्भात दरवर्षी नियमितपणे प्रकाशित केली जाणारी आकडेवारी यांचे विश्लेषण डॉ. रथ यांनी हाती घेतले आहे. त्या अभ्यासाद्वारे राज्याच्या नाशिक आणि जालना जिल्ह्यांतील औद्योगिक विश्वासंदर्भात पुढ्यात उलगडलेल्या काही रोचक बाबींचा मागोवा क्षेत्रीय संशोधनाद्वारे घेतला गेला व त्यावर यंदाच्या चर्चासत्रात ऊहापोह केला गेला. त्या चर्चेचा निवडक तपशील या अंकापासून सादर करण्याचा मानस आहे. ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

औद्योगिक

# एक दृष्टिक्षेप औद्योगिक महाराष्ट्रावर...

आर्थिक-औद्योगिकदृष्ट्या आपल्या देशातील एक संपन्न आणि पुढारलेले राज्य असा महाराष्ट्राचा लौकिक थेट त्याच्या स्थापनेपासून आहे. तो लौकिक रास्तही आहे. २०१२-१३ या वित्तीय वर्षासाठीचा राज्याचा जो आर्थिक अहवाल विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आला त्यांतील उद्योगांसंदर्भातील सांख्यिकी अभ्यसनीय ठरते. लोकसंख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ यांचा विचार करता, महाराष्ट्राचा देशभरात दुसरा क्रमांक लागतो. २०११ सालातील जनगणनेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येचे देशाच्या एकंदर लोकसंख्येशी असलेले प्रमाण जवळपास ९.३ टक्के इतके भरते. तर, राज्यात नागरीकरणाची सरासरी पातळी ४५.२ इतकी असल्याचे दिसते. देशात सर्वाधिक औद्योगीकरण झालेले राज्य म्हणूनही महाराष्ट्राची ओळख आहे. निर्यात प्रवर्तन विभागांची संख्या (एक्स्पोर्ट प्रमोशन झोन्स) सर्वाधिक असलेले राज्य हे बिरुदही पुन्हा महाराष्ट्रालाच लाभलेले आहे. आपल्या देशात आर्थिक पुनर्रचना पर्वाला १९९१ सालापासून जोरात सुरुवात झाल्यानंतर पालटता माहौल ध्यानात घेऊन १९९३ साली राज्याने औद्योगिक विकासाचे धोरण जाहीर केले. त्या मसुद्यात पुढे १९९५, २००१ आणि २००६ सालांत कालानुरूप बदल/सुधारणा करण्यात आल्या. आणि गेल्या वर्षी, म्हणजे, २०१३ सालातील जानेवारी महिन्यात औद्योगिक विकासाचे नवीन धोरण राज्य सरकारने जाहीर केले. १९९१ सालातील ऑगस्ट महिन्यापासून ते २०१२ सालातील नोव्हेंबर महिन्यापर्यंत आपल्या देशात जेवढे औद्योगिक प्रस्ताव मंजुरीसाठी सरकारदरबारी दाखल करण्यात आले त्यांपैकी १८ टक्के प्रस्तावांनी त्यांचे उद्योग महाराष्ट्रात कार्यान्वित करण्याचा मानस प्रगट केलेला होता. याच काळात आपल्या देशात एकंदर जेवढी औद्योगिक गुंतवणूक प्रस्तावित झाली तिच्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा होता १० टक्क्यांचा. तर, याच काळात देशभरात प्रस्तावित झालेल्या औद्योगिक रोजगारामध्ये महाराष्ट्राचा हिस्सा दिसतो २० टक्क्यांचा.



अर्थात, ही आकडेवारीही जरा सावधगिरीनेच अभ्यासावी लागते. राज्याच्या औद्योगीकरणातील काही नाजूक बाबी त्यांखेरीज नीट आकळत नाहीत. १९९१ सालातील ऑगस्ट महिना ते २०१२ सालातील नोव्हेंबर महिना या सुमारे २१ वर्षांच्या काळात औद्योगिक गुंतवणुकीच्या एकूण १७ हजार ८६६ प्रकल्पांना राज्यात मंजुरी देण्यात आली. या मंजूर प्रकरणांतील एकंदर प्रस्तावित गुंतवणूक होती तब्बल ९ लाख ५५ हजार ३२९ कोटी रुपयांची. परंतु, या आघाडीवर प्रत्यक्ष कार्यवाही कितपत झाली हे बघायला गेले तर दिसणारे चित्र निराळेच आहे. मंजूर प्रकल्पांपैकी प्रत्यक्षात ७ हजार ७०६ प्रकल्पच त्या २१ वर्षांदरम्यानच्या काळात कार्यान्वित झालेले दिसतात. म्हणजेच, एकंदर मंजूर प्रकल्पांशी कार्यवाही पूर्ण झालेल्या औद्योगिक प्रकल्पांचे प्रमाण भरते केवळ ४३.१ टक्के इतके. कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांद्वारे १ लाख ७८ हजार ४८३ कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात साकारली होती. एकंदर प्रस्तावित गुंतवणुकीशी तिचे प्रमाण भरते १८.६ टक्के इतके. आणि कार्यान्वित झालेल्या या प्रकल्पांद्वारे राज्यात एकंदर साडेनऊ लाख व्यक्तींना रोजगार मिळालेला होता. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात या संदर्भात आणखीही माहिती दिलेली आढळते. १९९१ ते २०१२ या काळात राज्यात जेवढ्या औद्योगिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आलेली होती त्यांपैकी २ हजार ५७ प्रकल्पांची कार्यवाही चालू होती. कार्यवाहीमध्ये असलेल्या प्रकल्पांची गुंतवणूक होती ७८ हजार ८०४ कोटी रुपयांची तर, या प्रकल्पांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याद्वारे २ लाख ९० हजार लोकांना रोजगार मिळणे अपेक्षित होते अथवा आहे.

म्हणजेच, १९९१ ते २०१२ या २१ वर्षांच्या काळात राज्यात जेवढ्या औद्योगिक प्रकल्पांना मंजुरी मिळाली त्यांतील कार्यवाही पूर्ण झालेल्या व कार्यवाही चालू असलेल्या प्रकल्पांची मंजूर प्रकल्पांशी असलेली टक्केवारी ५४.५२ इतकी भरते. तर, मंजूर प्रकल्पांतील एकंदर गुंतवणुकीशी कार्यवाही पूर्ण झालेल्या व कार्यवाही चालू असलेल्या प्रकल्पांतील गुंतवणुकीची टक्केवारी २६.३१ इतकीच भरते. उद्योग आकर्षित करण्याबाबत महाराष्ट्र देशभरात आघाडीवर असला तरी प्रत्यक्ष कार्यवाहीच्या आघाडीवरील राज्याची कामगिरी काही फारशी भरीव दिसत नाही, हाच निष्कर्ष यांवरून निघतो.

साधारपणे अशाच प्रकारचे चित्र अनुभवास येते परकीय थेट गुंतवणुकीच्याबाबतीत. १९९१ सालातील ऑगस्ट महिना ते २०१२ सालातील मार्च महिना या कालावधीदरम्यान परकीय थेट गुंतवणुकीच्या एकूण ४ हजार २४६ प्रकल्पांना राज्यात मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पांतील प्रस्तावित गुंतवणूक होती ९७ हजार ७९९ कोटी रुपयांची. परंतु, परकीय थेट गुंतवणुकीच्या मंजुरी मिळालेल्या प्रकल्पांपैकी केवळ ४५ टक्के प्रकल्पच काय ते पूर्णत्वास गेल्याचे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो. प्रस्तावित गुंतवणुकीपैकी ५१ टक्के इतकीच गुंतवणूक त्यांद्वारे वास्तवात साकारलेली दिसली. कार्यवाही चालू असलेल्या प्रकल्पांचे मंजूर प्रकल्पांशी असलेले प्रमाण होते १० टक्के इतके. तर, कार्यवाही सुरू असलेल्या प्रकल्पांतील परकीय थेट गुंतवणुकीचे एकंदर मंजूर गुंतवणुकीशी असलेले प्रमाण भरत होते आठ टक्के इतके. म्हणजेच, इथेही कार्यवाही पूर्ण झालेल्या आणि कार्यवाही चालू असलेल्या परकीय थेट गुंतवणुकीच्या प्रकल्पांचे एकंदर मंजूर प्रकल्पांशी असलेले प्रमाण ६१ टक्क्यांच्या घरात भरते. तर, या उभय गटांतील गुंतवणुकीचे एकंदर मंजूर गुंतवणुकीशी असलेले प्रमाण दिसते ५९ टक्के इतकेच. प्रत्यक्ष कार्यवाहीत आलेल्या प्रकल्पांचे मंजुरी मिळालेल्या देशी तसेच विदेशी गुंतवणुकीच्या एकंदर प्रकल्पांशी असलेले प्रमाण इतके लक्षणीय कमी का, यांबाबत मात्र राज्याच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात कोठेही ऊहापोह आढळत नाही.

विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स) विकासाद्वारे राज्यातील औद्योगिक विकासाला एक नवीन परिमाण व दिशा देण्याचे धोरण महाराष्ट्राने २००६ सालातील फेब्रुवारी महिन्यापासून स्वीकारले. तिथपासून राज्यामध्ये किती विशेष आर्थिक क्षेत्रांना मंजुरी देण्यात आली, मंजुरी देण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी किती क्षेत्रे अधिसूचीत करण्यात आली आणि अधिसूचन झालेल्या एकूण क्षेत्रांपैकी किती विशेष आर्थिक क्षेत्रे प्रत्यक्षात कार्यवाहीत उतरली यांबाबत आर्थिक सर्वेक्षण अहवालात सादर करण्यात आलेली सांख्यिकी मनोज्ञ आहे. खास करून या तीनही गटांतील विशेष आर्थिक क्षेत्रांचे राज्यांतर्गत सहा महसूल विभागांमध्ये झालेले स्थानांकन विलक्षणच बोलके आहे.



आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आलेल्या तपशीलानुसार, २००६ सालातील फेब्रुवारी महिन्यापासून ते २०१२ सालातील नोव्हेंबर महिन्यापर्यंत विशेष आर्थिक क्षेत्रांचे एकूण २३४ प्रस्ताव राज्यात दाखल करण्यात आले. त्यांपैकी १२४ प्रकल्पांना केंद्र सरकारने अनुमती दिली. म्हणजे, विशेष आर्थिक क्षेत्र राज्यामध्ये स्थापन करण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या एकंदर प्रस्तावांशी मंजुरी मिळालेल्या प्रस्तावांचे प्रमाण ५३ टक्के इतके भरते. मंजुरी मिळालेल्या या १२४ प्रस्तावांपैकी ६४ प्रस्ताव अधिसूचीत करण्यात आले. मंजुरी मिळालेल्या प्रकल्पांशी अधिसूचीत झालेल्या प्रकल्पांची असणारी टक्केवारी जवळपास ५२ इतकी भरते. २०१२-१३ या वित्तीय वर्षासाठीच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्षात १७ विशेष आर्थिक क्षेत्रे सक्रिय बनलेली होती. व्यवहारात कार्यरत बनलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांची राज्यात दाखल झालेल्या एकंदर प्रस्तावांशी, केंद्र सरकारची मंजुरी मिळालेल्या प्रस्तावांशी आणि अधिसूचीत झालेल्या प्रस्तावांशी भरणारी टक्केवारी अनुक्रमे ७.२६, १३.७१ आणि २६.५६ अशी भरते.

विशेष आर्थिक क्षेत्रांच्या ज्या १२४ प्रस्तावांना केंद्र सरकारची अनुमती मिळालेली आहे त्यांत १ लाख ४३ हजार ७८९ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. जे ६४ प्रस्ताव अधिसूचीत झालेले आहेत त्यांतील प्रस्तावित गुंतवणूक आहे ती ७७ हजार ४७८ कोटी रुपयांची. तर, जी १७ विशेष आर्थिक क्षेत्रे राज्यात प्रत्यक्ष कार्यवाहीत आलेली आहेत त्यांद्वारे साकारलेली गुंतवणूक दिसते ती १० हजार ८३६ कोटी रुपयांची. मंजुरी मिळालेल्या १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांद्वारे निर्माण होणारा अपेक्षित वा प्रस्तावित रोजगार आहे ५५ लाख ७२ हजार इतका. जी ६४ विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचीत झालेली आहेत त्यांत २१ लाख ५० हजार व्यक्तींना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित/प्रस्तावित आहे. वास्तवात जी १७ विशेष आर्थिक क्षेत्रे राज्यात कार्यरत झालेली आहेत त्यांद्वारे एकूण साडेआठ लाख व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला असल्याचे आर्थिक सर्वेक्षण अहवालातील सांख्यिकी सांगते. विशेष आर्थिक क्षेत्रांच्या राज्यातील प्रचलीत चित्राचा रागरंग साधारणपणे असा दिसतो.

या विशेष आर्थिक क्षेत्रांचे राज्यांतर्गत विविध महसूल विभागांत असलेले विभजन मोठे रंजक दिसते. केंद्र सरकारची मंजुरी मिळालेल्या १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी तब्बल ९७ विशेष आर्थिक क्षेत्रे (एकूणांतील ७८ टक्के) कोकण आणि पुणे या केवळ दोनच महसूल विभागांत आहेत. त्यांतल्या त्यांतही पुन्हा तुलनेने अधिक पसंती दिसते ती कोकण विभागाला म्हणजेच मुख्यतः मुंबईच्या निकट साहचर्याला. कारण, या ९७ पैकी ६० विशेष आर्थिक क्षेत्रे एकट्या कोकण विभागात आहेत. म्हणजेच, मंजुरीप्राप्त विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी ४८ टक्के विशेष आर्थिक क्षेत्रांचे स्थानांकन एकट्या कोकण विभागात असणार आहे. उरलेली जी २७ मान्यताप्राप्त विशेष आर्थिक क्षेत्रे आहेत त्यांतील २५ विशेष आर्थिक क्षेत्रे नाशिक (६), औरंगाबाद (११) आणि नागपूर (८) या तीन महसूल विभागांत दिसतात. अधिसूचीत झालेल्या ६४ विशेष आर्थिक क्षेत्रांचे महसूल विभागवार विभजन असेच व तितकेच विषम दिसते. ६४ पैकी ४८ (म्हणजे, ७५ टक्के) विशेष आर्थिक क्षेत्रे कोकण आणि पुणे या दोन विभागांतच एकवटलेली आहेत. उरलेल्या १६ अधिसूचीत विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी १३ विशेष आर्थिक क्षेत्रे औरंगाबाद (७) आणि नागपूर (६) या दोन महसूल विभागांत आहेत. जी १७ विशेष आर्थिक क्षेत्रे राज्यात कार्यरत बनलेली आहेत त्यांचे विभागवार विभजन तर अधिकच मजेशीर दिसते. कार्यरत झालेल्या १७ विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी ११ विशेष आर्थिक क्षेत्रे एकट्या पुणे विभागातच स्थानांकित झालेली आहेत. औरंगाबाद आणि नागपूर विभागांतील अनुक्रमे सात आणि सहा विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचीत झालेली असली तरी त्यांतील अनुक्रमे केवळ एक आणि दोन विशेष आर्थिक क्षेत्रेच काय ती प्रत्यक्षात कार्यरत झालेली दिसतात. इथे विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे, मंजुरीप्राप्त १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी ६० विशेष आर्थिक क्षेत्रे एकवटलेल्या कोकण विभागातील केवळ तीनच विशेष आर्थिक क्षेत्रे सक्रिय बनलेली दिसतात. अमरावती महसुली विभाग मात्र विशेष आर्थिक क्षेत्रांच्यासंदर्भातील सर्वच बाबतींत सतत पिछाडीवर पडलेला दिसतो. मंजुरी मिळालेल्या आणि अधिसूचीत झालेल्या या विभागातील दोन विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी एकही २०१२-१३ सालापर्यंत कार्यरत झालेले नव्हते.



राज्यात आजघडीला कार्यरत असलेल्या सर्व प्रकारच्या उद्योगांचे भौगोलिक स्थानांकन बारकाईने अभ्यासले तर त्यांतील प्रादेशिक असमतोल ठसठशीतपणे डोळ्यांत भरतो. आर्थिक सर्वेक्षण अहवालातील आकडेवारी या वस्तुस्थितीची द्योतक आहे. २०११ सालातील डिसेंबर महिन्याचे औद्योगिक चित्र पाहिले तर राज्यात एकंदर ४ हजार ९१५ मोठे उद्योग कार्यरत होते असे दिसते. त्यांतील ६२ टक्के मोठे उद्योग कोकण आणि पुणे या दोनच महसूल विभागांत एकवटलेले होते.

मोठ्या उद्योगांची स्थापना आणि लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगांची वाढ या दोहोंत एक प्रकारचा जैविक सहसंबंध सर्वत्रच दिसतो. मोठ्या आकारमानाच्या उद्योगांना चालना मिळाली की अशा उद्योगांना कच्चा माल, यंत्रोपकरणे, सुटे भाग, नाना प्रकारच्या अभियांत्रिकी सेवा पुरविणारे पूरक उद्योग त्यांच्या परिसरात जोमाने वाढू लागतात. ही प्रक्रिया जसजशी वेग पकडत जाते तसतसा त्या परिसरातील लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगांचा पसारा संख्यात्मक तसेच गुणात्मकदृष्ट्या विस्तारत जातो. अर्थात, सगळेच उद्योग हे स्वरूपतः पूरक उद्योग असत नाहीत. परिसरातील लोकसंख्येच्या नित्याच्या गरजा भागविणा-या अनंत प्रकारच्या वस्तू व सेवांचे उत्पादन करणारे असंख्य उद्योग यथावकाश आकार घेत राहतात. परंतु, एखाद्या प्रदेशाच्या औद्योगिकरणाला मोठ्या आकारमानाचे उद्योग स्थापन झाल्याने चालना मिळते हा बहुशः सगळ्याच ठिकाणचा अनुभव आहे.

राज्यातील वेगवेगळे महसुली विभागही या न्यायाला अपवाद ठरत नाहीत. २०१३ सालातील जानेवारी महिन्याच्या अखेरीस राज्यात एकूण १ लाख ६३ हजार ५६६ लघुतम, लघु आणि मध्यम आकारमानाचे उद्योग कार्यरत होते. त्यांतील जवळपास ६७ टक्के लघुतम, लघु आणि मध्यम आकारमानाचे उद्योग पुणे (४१.६टक्के) आणि कोकण (२५.२ टक्के) याच दोन महसुली विभागांत एकवटलेले होते.

राज्यातील उद्योगांचे विश्व हे ढोबळ मानाने असे दिसते. त्याच्या अंतरंगात अलीकडील काळात साकारत असलेल्या काही लक्षणीय बदलांचा परिचय इथून पुढे करून घ्यायचा आहे. ■■

# औद्योगिक बदलांचे प्रवाह - अंतःप्रवाह

महाराष्ट्राच्या सर्वसाधारण औद्योगिक चित्राचे बहिरंग जाणून घेतल्यानंतर याच चित्राचे अंतरंग नेमके कसे असेल, याची उत्सुकता वाटणे स्वाभाविक ठरते. औद्योगिक विकास-विस्ताराच्याबाबतीत राज्यातील वेगवेगळ्या विभागांत लक्षणीय तफावत दिसून येते, हे वास्तव सगळ्यांनाच परिचित आहे. त्या संदर्भात आजवर अनेक माध्यमांतून व व्यासपीठांवरून भरपूर चर्चाही झालेली आहे. त्यांमुळे, महसुली विभागांप्रमाणेच राज्याच्या जिल्ह्याजिल्ह्यातील उद्योगांचे वास्तव कसे दिसते हे अभ्यासणेही रोचक बनते. त्यांसाठी उद्योगांसंदर्भातील जिल्हास्तरीय आकडेवारी निरखणे आवश्यक ठरते. अशी आकडेवारी उपलब्ध करून देणारे आपल्या देशात महत्त्वाचे दोन स्त्रोत आहेत. आर्थिक गणना (इकॉनॉमिक सेन्सस) हा झाला त्यांतील पहिला स्त्रोत. तर, उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (ॲन्युअल सर्व्हे ऑफ इंडस्ट्रीज्) हा झाला दुसरा महत्त्वाचा स्त्रोत. हे दोन्ही स्त्रोत अधिकृत असून केंद्र सरकारच्या केंद्रीय संख्याशास्त्रीय संघटनेच्या (सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन - सीएसओ) अधीन ते आहेत.

राज्याराज्यांतील अर्थ व सांख्यिकी संचालनालयांच्या यंत्रणेद्वारे केंद्रिय संख्याशास्त्रीय संघटना आर्थिक गणना आणि उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण पार पाडत असते. त्यांद्वारे उपलब्ध होणारी सांख्यिकी हा अर्थशास्त्राच्या अभ्यासक-संशोधकांच्या लेखी बहुमोल माहितीचा मोठा खजिनाच ठरतो. यांपैकी, उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण हे नावाप्रमाणेच दरवर्षी हाती घेतले जाते. तर, आर्थिक गणनेचे मात्र ठरावीक असे वेळापत्रक नसते. प्रत्येक राज्यातील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अखत्यारीतील जिल्हास्तरीय सांख्यिकी कार्यालय त्या त्या जिल्ह्यातील उद्योगांचे सर्वेक्षण करून माहिती संकलित करण्याचे काम करत असते. आर्थिक गणना आणि उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण या दोन्हींसाठी उद्योगांशी संबंधित आकडेवारी प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीद्वारे गोळा करण्याचे काम जिल्हा सांख्यिकी कार्यालयच करत असते.



**उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (ॲन्युअल सर्व्हे ऑफ इंडस्ट्रीज्)**

*आपल्या देशातील उद्योगचित्राचे मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असणारा तपशील आणि निर्देशक उपलब्ध करून देणारा अधिकृत सांख्यिकी स्त्रोत म्हणजे उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण. कारखाने अधिनियम १९४८च्या कलम २म (१) आणि कलम २म (२) अन्वये नोंदणी झालेल्या तसेच, बिडी आणि सिगारेट कामगार (रोजगाराच्या शर्ती) अधिनियम १९६६ अंतर्गत नोंदणी झालेल्या सर्व कारखान्यांचा समावेश दरवर्षी केल्या जाणा-या या पाहणीमध्ये केलेला असतो. संपूर्ण देशभरात हे सर्वेक्षण केले जात असते. अरुणाचल प्रदेश, मिझोराम आणि सिक्कीम ही ईशान्येकडील तीन राज्ये आणि लक्षद्वीप हा केंद्रशासित प्रदेश मात्र या सर्वेक्षणातून वगळलेला असतो. देशातील राज्याराज्यांत कार्यरत असणा-या वस्तुनिर्माण उद्योगांचे ते निर्माण करत असलेल्या उत्पादन प्रकारानुसार वर्गीकरण करण्यासाठी 'नॅशनल इंडस्ट्रीअल क्लासिफिकेशन' या वर्गीकरण प्रणालीचा या पाहणीत उपयोग केलेला असतो. देशात कार्यरत असलेल्या सर्व उद्योगघटकांची माहिती दोन विभागांमध्ये संकलित व सादर केलेली असते. त्या विभागांना अनुक्रमे 'सेन्सस सेक्टर' आणि 'सॅम्पल सेक्टर' असे म्हणतात. त्या त्या राज्यातील ज्या उद्योगांमध्ये १०० किंवा त्यांपेक्षा अधिक कामगार काम करत असतात अशा सर्व उद्योगांकडून गोळा केलेली माहिती 'सेन्सस सेक्टर'मध्ये सादर केलेली असते. तर, १००पेक्षा कमी कामगार संख्या असलेल्या उद्योगांची नमुना तत्त्वावर गोळा केलेली सांख्यिकी 'सॅम्पल सेक्टर'मध्ये सादर केलेली असते. या नमुना पाहणीमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नमुना त्या त्या उत्पादन गटातील एकंदर उद्योगघटकांचे सुयोग्य प्रतिनिधित्व करतो आहे किंवा नाही, हे तपासून बघण्याची पूर्ण काळजी नमुना निवडतेवेळी घेतलेली असते. त्याच वेळी, प्रत्येक राज्यात कार्यरत असलेल्या विविध उत्पादन गटांतील उद्योग त्या नमुन्यात प्रातिनिधिक तत्त्वावर यथायोग्य प्रकारे समाविष्ट केले जातील याचीही दक्षता घेण्यात येते.*

**आर्थिक गणना (इकॉनॉमिक सेन्सस)**

*देशाच्या चतुःसीमांमध्ये कार्यरत असणा-या यच्चयावत उद्योगघटकांचा अंतर्भाव आर्थिक गणनेमध्ये केलेला असतो. वस्तुनिर्माण आणि सेवा अशा दोन्ही उद्योगांमध्ये सक्रिय असणा-या उद्योगव्यवसाय घटकांचा समावेश या सर्वेक्षणामध्ये केला जातो. केवळ उपभोगासाठीच नव्हे तर अन्य हेतूंसाठी उत्पादन आणि/अथवा वितरित करण्यात आलेल्या वस्तू व सेवांची निर्मिती करणा-या उद्योगव्यवसाय घटकांकडून संकलित करण्यात आलेली आकडेवारी या गणनेद्वारा अभ्यासकांसाठी उपलब्ध होत असते. आपल्या देशात आजवर १९७७, १९८०, १९९०, १९९८ आणि २००५ अशा पाच वर्षी यापूर्वी आर्थिक गणना घेतली गेलेली आहे. तर, २०१३ सालातील जानेवारी महिन्यापासून ते २०१४ सालातील एप्रिल महिन्यादरम्यानच्या काळात सहाव्या आर्थिक गणनेचे काम पूर्ण करण्यात आले. देशाच्या अगदी कानाकोप-यांतील खेडेगावांपर्यंत विविध वस्तू व सेवांच्या निर्मितीमध्ये सक्रिय असलेल्या सर्वच्या सर्व उद्योगव्यवसाय घटकांचा समावेश या गणनेमध्ये केलेला असतो. देशभरात कार्यरत असलेल्या उद्योगघटकांची एकूण संख्या तसेच त्या उद्योगव्यवसाय घटकांमध्ये रोजंदारी कमावणा-या कामगारांची संख्या या आर्थिक गणनेद्वारे आपल्याला उपलब्ध होत असते. आपल्या देशातील उद्योगघटकांचा मागोवा घेण्यास आधारभूत असणारे हे दोन मुख्य माहितीस्त्रोत होत. उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणाद्वारे उद्योगक्षेत्रातील केवळ अधिकृत नोंदणीकृत कारखान्यांसंदर्भातील आकडेवारी आपल्याला मिळते. तर, सर्व आकारमानाच्या आणि अधिकृत अथवा अनधिकृत अशा कोणत्याही वर्गातील यच्चयावत उद्योगव्यवसाय घटकांसंदर्भातील सांख्यिकी आर्थिक गणनेद्वारे आपल्या हाती येते. केंद्र तसेच राज्य सरकारांचे धोरणकर्ते, नियोजनकार, संशोधक तसेच उद्योगांच्या विकासविस्ताराशी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे संबंधित असलेल्या देशी-विदेशी सर्व घटकांना व्यापक स्तरावरील आणि संतुलित प्रादेशिक विकासाला चालना देणारी धोरणे आखण्यास या माहितीचा उपयोग होत असतो.*



महाराष्ट्रातील उद्योगविश्वाच्या अंतरंगात बदलांचे जे प्रवाह - अंतःप्रवाह अलीकडे वाहताना दिसतात त्यांचा परिचय करून घेण्यासाठी उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणाद्वारे हाती येणारी १९९८ ते २०१० या कालावधीदरम्यानच्या प्रत्येक वर्षाची सांख्यिकी तसेच, १९९८ आणि २००५ या दोन वर्षी देशात घेण्यात आलेल्या आर्थिक गणनांची आकडेवारी या ठिकाणी विश्लेषणासाठी वापरलेली आहे. या दोन आकडेवारींच्या परीक्षणाद्वारे उभरणारे राज्यातील उद्योगविश्वाच्या अंतरंगातील बदलत्या प्रवाहांचा मागोवा इथून पुढे घेतलेला आहे.

आर्थिक गणनेद्वारे जी सांख्यिकी हाती येते तिचा विचार या ठिकाणी प्रथम केलेला आहे. राज्याच्या कानाकोप-यांत कार्यरत असलेल्या नोंदणीकृत तसेच अ-नोंदणीकृत अशा सर्व उद्योगव्यवसाय घटकांकडून या गणनेमध्ये आकडेवारी गोळा केलेली असते. अनंत प्रकारच्या वस्तू व सेवांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या उद्योगव्यवसाय घटकांचा समावेश आर्थिक गणनेमध्ये केलेला असतो. उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणामध्ये केवळ नोंदणीकृत कारखान्यांसंदर्भातीलच आकडेवारी सादर केलेली असते. 'कारखाना' या संकल्पनेमध्ये अंतर्भाव केला जाणा-या उद्योगघटकांची सुस्पष्ट व्याख्या करण्यात आलेली आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील ऊर्जास्त्रोत वापरणा-या आणि १० अथवा १०पेक्षा अधिक कामगार कामाला असणा-या उद्योगाला संबंधित कायद्यान्वये 'कारखाना' असे म्हटले जाते. त्याच वेळी, कोणत्याही प्रकारच्या ऊर्जास्त्रोताचा वापर न करणा-या आणि २० अथवा २०पेक्षा अधिक कामगार रोजंदारीवर असलेल्या उद्योगघटकांचाही समावेश 'कारखाना' या संकल्पनेमध्ये केला जातो. त्यांमुळे, केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर, संपूर्ण देशभरात ठिकठिकाणी कार्यरत असलेल्या अ-नोंदणीकृत उद्योगव्यवसायांच्या अफाट विश्वामध्ये डोकवण्यास हातभार लावणारी आकडेवारी आपल्या देशात अभ्यासकांना केवळ एकाच अधिकृत स्त्रोताद्वारे उपलब्ध होऊ शकते आणि तो स्त्रोत म्हणजे आर्थिक गणना. परंतु, दशवार्षिक जनगणनेप्रमाणे आर्थिक गणनेचे निश्चित असे वेळापत्रक नसल्याने निश्चित कालखंडानंतर केलेल्या पाहणीद्वारे हमखास उपलब्ध होणारी आकडेवारीची अखंडित साखळी संशोधनासाठी हाती येत नाही.

राज्यातील वस्तुनिर्माण उद्योगांचे राज्याच्या काही भागांतच केंद्रीकरण घडून येण्याची जी प्रवृत्ती आर्थिक सर्वेक्षण अहवालातील आकडेवारीवरून पुढ्यात येते त्या प्रवृत्तीला आर्थिक गणनेद्वारे उपलब्ध होणारी आकडेवारीही दुजोराच देते. १९९८ साली राज्यातील नागरी विभागांत जितके वस्तुनिर्माण उद्योग कार्यरत होते त्यांपैकी ४९.२१ टक्के उद्योग मुंबई, ठाणे आणि पुणे या तीन जिल्ह्यांतील नागरी भागांत एकवटलेले होते. आपण नाशिकचाही यात समावेश केला तर हे प्रमाण जाऊन पोहोचते ५३.३५ टक्क्यांवर. २००५ साली घेण्यात आलेली आर्थिक गणनेची आकडेवारी जवळपास हेच चित्र दाखवते. २००५ सालच्या आर्थिक गणनेतील आकडेवारीनुसार राज्यभरातील नागरी विभागांत जेवढे वस्तुनिर्माण उद्योग होते त्यांतील ४९.६६ टक्के उद्योग मुंबई, ठाणे आणि पुणे या तीन जिल्ह्यांतील नागर विभागांत एकवटलेले होते. नाशिकसह हेच प्रमाण जाऊन पोहोचते ५४.०९ टक्क्यांवर. मुंबई-ठाणे-नाशिक-पुणे या चार जिल्ह्यांच्या बाहेर वस्तुनिर्माण उद्योगांचे केंद्रीकरण झालेले अन्य दोन जिल्हे म्हणजे औरंगाबाद आणि नागपूर. हे दोन जिल्हेही वरील चार जिल्ह्यांत मिळवले तर राज्यातील केवळ सहा जिल्ह्यांमधील नागरी विभागांमध्ये राज्याभरातील शहरी भागांत कार्यरत असलेल्या एकूण वस्तुनिर्माण उद्योगांपैकी ६२.१३ टक्के उद्योग एकवटल्याचे चित्र १९९८ साली घेण्यात आलेली आर्थिक गणना आपल्या पुढ्यात मांडते. २००५ साली घेण्यात आर्थिक गणनेनुसार याच सहा जिल्ह्यांमधील शहरी भागांत राज्यातील सगळ्या नागरी केंद्रांमध्ये तेव्हा कार्यरत असलेल्या एकंदर वस्तुनिर्माण उद्योगांपैकी ६४.३६ टक्के उद्योग केंद्रित झालेले दिसून आले. गंमत म्हणजे, नागरीकरणाच्या प्रक्रियेत देशभरात अग्रेसर असणा-या महाराष्ट्रातील बहुतांश शहरी विस्तारही कोकण, पुणे आणि नाशिक याच तीन महसूल विभागांमध्ये एकवटलेला दिसतो.

उद्योगांची संख्या आणि तिच्यात पडणारी भर हा जसा औद्योगिक वाढविस्ताराचा एक मूलभूत निर्देशक मानला जातो त्याचप्रमाणे उद्योगांद्वारे निर्माण होणारा रोजगार हाही औद्योगिकरणाच्या गतिमानतेचा दुसरा पैलू गणला जातो. त्यांमुळे, राज्यभरात सक्रिय असणा-या वस्तुनिर्माण उद्योगांमधील रोजगाराचे चित्र कसे दिसते ते पाहणे हीसुद्धा रोचक बाब बनते.



महाराष्ट्राच्या सर्व भागांतील वस्तुनिर्माण व सेवा उद्योगांत सक्रिय असलेल्या व्यवसायघटकांच्या संख्येत १९९८ ते २००५ या काळात जवळपास ३१ टक्क्यांनी वाढ घडून आल्याचे आर्थिक गणना सांगते. परंतु, गंमत म्हणजे याच काळात या उद्योगव्यवसाय घटकांमधील रोजगार मात्र केवळ ८.२७ टक्क्यांनी वाढला. इथे नोंदवून ठेवण्यासारखे आणखी एक महत्त्वाचे वास्तव म्हणजे, राज्याच्या ग्रामीण भागांत कार्यरत असणा-या उद्योगव्यवसाय घटकांमधील रोजगारात १९९८ आणि २००५ या काळात घडून आलेली १९.९५ टक्क्यांची वाढ ही त्याच काळात शहरी भागांतील उद्योगव्यवसाय घटकांमधील रोजगारात घडून आलेल्या १.८९ टक्के इतक्या स्वल्प वाढीच्या तुलनेत किती तरी अधिक होती. हे वास्तव खरोखरच चिंतनीय ठरते कारण, १९९८ आणि २००५ या काळात राज्याच्या ग्रामीण तसेच शहरी विभागांतील उद्योगव्यवसाय घटकांच्या संख्येत जवळपास सारखीच, म्हणजे अनुक्रमे, ३०.९३ टक्के आणि ३०.९१ टक्के अशी वाढ घडून आल्याचे आर्थिक गणना सांगते. ग्रामीण आणि शहरी महाराष्ट्राच्या या संदर्भातील वर्तनातील ही तफावत जितकी चिंत्य तितकीच चिंतनीय ठरते. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# औद्योगिकरण आणि नागरीकरण

औद्योगिकरण आणि नागरीकरण यांचा अत्यंत निकटचा सहसंबंध आहे आणि असतो. शहरांची निर्मिती आणि शहरी लोकसंख्येची वाढ हे सर्वसाधारण आर्थिक विकासाचे अपत्य गणले जाते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेदरम्यान कोणत्याही देशाच्या, राज्याच्या अथवा प्रांताच्या अर्थव्यवस्थेत जे संरचनात्मक बदल घडून येत राहतात त्या बदलांमुळे शहरीकरणाच्या वाढविस्ताराला अनुकूल भूमी निर्माण होत असते. दरडोई उत्पन्नाची सरासरी पातळी उंचावू लागली की सुरु वातीच्या टप्प्यांवर वाढीव उत्पन्नाचा मोठा हिस्सा अन्नधान्यावर खर्च होत राहतो. मात्र, दरडोई सरासरी उत्पन्नाची पातळी तशीच पुढे वाढत राहिली की अन्नधान्येतर वस्तू व सेवांच्या उपभोगावर खर्च करण्याकडे सर्वसाधारण प्रवृत्ती व क्षमता वाढीस लागते. त्यांद्वारे अन्नधान्येतर वस्तू व सेवांना असणारी मागणी वाढू लागते. त्यांतून अशा जिनसांच्या उत्पादनाकडे गुंतवणूक वाढू लागते. नानाविध वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा पाया विस्तारण्यासाठी मोठ्या बाजारपेठांची गरज असते. त्यांमुळे, ज्या कोणत्याही ठिकाणी लोकसंख्येच्या केंद्रीकरणाची प्रवृत्ती परंपरेने बळावत आलेली असते अशा ठिकाणी वस्तुनिर्माण तसेच सेवा उद्योगांचे केंद्रीकरण गतिमान बनते. त्या ठिकाणाकडे मग यथावकाश स्थलांतरितांचा प्रवाह वाहू लागतो. ही प्रक्रिया अधिक सघन बनली की त्या ठिकाणी लोकसंख्या, उद्योगधंदे, कसबी कामगार, व्यापारउदीम, बँका, वाहतूक... अशा अन्य अर्थघटकांचे केंद्रीकरण वाढीस लागते. त्यांमुळे, त्या ठिकाणाचे रंगरूप आणि मुख्य म्हणजे त्याच्या अर्थकारणाचा पायाभूत ढाचा बदलतो. कधी एके काळी मुख्यतः शेतीप्रधान असलेल्या त्या ठिकाणाला यथावकाश बिगर शेती उद्योगधंद्यांच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त होऊन त्याचे रूपांतर हळूहळू शहरामध्ये घडून येते. म्हणजेच, बिगर शेती उद्योगव्यवसायांचा उदय आणि शहरांची वाढ या दोन परस्परपूरक आणि परस्परपोषक गोष्टी असतात. साहजिकच, उद्योगधंद्यांच्या वाढविकासाद्वारे त्या त्या प्रांतातील शहरीकरणाच्या विकास-विस्ताराचा तोंडवळा निश्चित होत जातो.



नागरीकरणाच्या या सैद्धांतिक उपपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपण जेव्हा महाराष्ट्रातील औद्योगिकरण आणि शहरीकरण यांच्या आकृतिबंधाकडे पाहतो त्यांवेळी त्यांच्यातील घनिष्ठ सहसंबंधांचा आपल्याला व्यावहारिक प्रत्यय आल्याखेरीज राहत नाही. १९९८ सालच्या आर्थिक गणनेनुसार, राज्याच्या शहरी भागांत जेवढे वस्तुनिर्माण उद्योग त्या वेळी कार्यरत होते त्यांच्यातील जवळपास ४९ टक्के वस्तुनिर्माण उद्योग मुंबई, ठाणे आणि पुणे या तीन जिल्ह्यांतील शहरी भागांत एकवटलेले होते. २००५ सालातील आर्थिक गणनेद्वारे हाती आलेल्या आकडेवारीनुसार केंद्रीकरणाचे ते प्रमाण तसेच टिकून होते. या वास्तवाचा विस्मय वाटण्याचे कारण नाही. देशाची वित्तीय राजधानी असलेली मुंबई महाराष्ट्राची राजकीय राजधानी आहे. मुंबईचा समावेश तांत्रिकदृष्ट्या राज्याच्या कोकण महसूल विभागामध्ये होतो. मुंबईला खेटूनच असलेला ठाणे जिल्हाही कोकण विभागातच मोडतो. कोकण आणि पुणे या दोन महसुली विभागांत राज्यातील एकंदर नागरी लोकसंख्येपैकी तब्बल ६२.९३ टक्के नागरी लोकसंख्या एकवटल्याचा दाखला १९६१ सालातील जनगणनेची आकडेवारी देते. २००१ सालातील जनगणनेच्या आकडेवारीनुसार कोकण आणि पुणे या दोन महसुली विभागांत राज्यातील तत्कालीन एकूण नागरी लोकसंख्येपैकी ६३.७४ टक्के शहरी लोकसंख्या एकवटलेली होती.

कोकण व पुणे विभागांच्या बरोबरीनेच आपण औरंगाबाद महसुली विभागही विचारात घेतला तर, राज्यातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी ७० टक्के शहरी लोकसंख्या १९६१ साली कोकण, पुणे व औरंगाबाद या तीन महसुली विभागांत केंद्रीभूत झाल्याचे संबधित आकडेवारी आपल्याला सांगते. २००१ सालच्या जनगणनेनुसार याच तीन विभागांत राज्यातील तेव्हाच्या एकंदर नागरी लोकसंख्येपैकी जवळपास ७३ टक्के शहरी लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले दिसते. म्हणजेच, मुंबई-पुण्याच्या पट्ट्यातच औद्योगिकरणाचे आणि नागरीकरणाचे केंद्रीकरण होत राहण्याची प्रवृत्ती राज्यस्थापनेपासून अगदी आजवर तशीच गतिमान राहिलेली आहे. राज्यातील एकूण विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी बहुसंख्य विशेष आर्थिक क्षेत्रे याच दोन-तीन महसूल विभागांत एकवटलेली असावीत हे मग स्वाभाविकच ठरते.

वस्तुनिर्माण उद्योगघटकांचे केंद्रीकरण कोकण आणि पुणे महसूल विभागांव्यतिरिक्त नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर या विभागांतही काही प्रमाणात झालेले आहे. राज्यात या बाबतीत सर्वांत पिछाडीवर पडलेला विभाग म्हणजे अमरावती. अर्थात, जे महसूल विभाग औद्योगिक विकास-विस्तारात पुढे दिसतात तिथेही वस्तुनिर्माण उद्योगांची वाढ पुन्हा त्या त्या विभागांतील काही निवडक जिल्ह्यांमध्ये अथवा काही निवडक जिल्ह्यांना अनुसरूनच झालेली दिसते. राज्यातील वस्तुनिर्माण उद्योगांत रोजगार मिळालेल्यांची जी जिल्हावार आकडेवारी आर्थिक गणनेद्वारे आणि उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षण अहवालांद्वारे आपल्या हातात येते तिच्या विश्लेषणावरून हाच निष्कर्ष निघतो. २००५ सालातील आर्थिक गणनेची आकडेवारी या संदर्भात अतिशय बोलकी ठरते. राज्यभरातील वस्तुनिर्माण उद्योगांत निर्माण झालेल्या एकंदर रोजगारापैकी २० ते २५ टक्के रोजगार त्या वेळी एकट्या मुंबईत (यात मुंबई आणि मुंबई उपनगर अशा दोन्ही जिल्ह्यांचा समावेश इथे केलेला आहे) केंद्रीभूत झालेला होता. त्या खालोखाल, पुणे आणि ठाणे या दोन जिल्ह्यांमध्ये राज्यातील वस्तुनिर्माण उद्योगांतील तत्कालीन एकूण रोजगारापैकी प्रत्येक १० ते २० टक्के रोजगार एकवटलेला होता. या क्रमवारीत तिस-या क्रमांकावर तेव्हा होता कोल्हापूर जिल्हा. राज्यात कार्यरत असलेल्या वस्तुनिर्माण उद्योगातील एकंदर रोजगारापैकी ५ ते १० टक्के रोजगार कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत असणा-या वस्तुनिर्माण उद्योगांत सामावलेला होता. तर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये एकवटलेल्या रोजगाराची प्रत्येकी टक्केवारी अवघी दोन ते पाचच्या दरम्यान होती.

म्हणजे, राज्याच्या पूर्वेकडील नागपूर व मध्य भागातील औरंगाबाद वगळता वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगारनिर्मिती राज्याच्या पश्चिम पट्ट्यातील पाच-सात जिल्ह्यांच्या बाहेर पसरलेलीच नाही. आर्थिक गणनेमध्ये असंघटित क्षेत्रातील अ-नोंदित उद्योगव्यवसायांचीही दखल घेतलेली असते. उद्योगांचे संघटित क्षेत्र आणि अ-संघटित क्षेत्र यांच्यातील जैविक नाते ध्यानात घेता संघटित उद्योगांचा पाया विस्तारलेल्या भागांतच असंघटित उद्योगांनीही बस्तान ठोकलेले दिसावे, यांत अनैसर्गिक काहीच नाही.



वस्तुनिर्माण उद्योगांचा आणि त्यांतील रोजगाराचा राज्याच्या काही जिल्ह्यांतच केंद्रीभूत होण्याचा हा कल उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणाद्वारे हाती येणा-या सांख्यिकीमधूनही अधोरेखित होतो. महाराष्ट्रातील वस्तुनिर्माण उद्योगांची नमुना तत्त्वावरील एक वेगळी पाहणी २०१० साली करण्यात आली. उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये कार्यरत असणा-या उद्योगांपैकी काही उद्योगांचा समावेश नमुना तत्त्वावर करण्यात येणा-या तशा पाहणींमध्ये करण्यासाठी जेवढे उद्योग सर्वसाधारणपणे निवडण्यात येतात त्यांपेक्षा अधिक संख्येने या पाहणीसाठी जिल्ह्याजिल्ह्यातून उद्योग निवडण्यात आलेले होते. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात त्या त्या जिनसांच्या उत्पादनामध्ये सक्रिय असणा-या उद्योगघटकांचे पुरेसे व यथार्थ प्रतिनिधित्व संख्याशास्त्रीय नियमसंकेतांनुसार निवडलेल्या नमुन्यामध्ये केले जावे याबाबतची दक्षता घेऊन या पाहणीसाठी नमुना (सॅम्पल) निश्चित करण्यात आल्याने त्याचे संख्यात्मक आकारमान नेहेमीपेक्षा अधिक ठेवण्यात आलेले होते.

सन २००५ साली घेण्यात आलेल्या आर्थिक गणनेद्वारे हाती येणा-या सांख्यिकीमधून वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगाराचे राज्यातील काहीच जिल्ह्यांमध्ये झालेले जे केंद्रीकरण पुढ्यात येते त्या केंद्रीकरणावर या सर्वेक्षणाद्वारे उपलब्ध होणारी आकडेवारी शिक्कामोर्तब करतो. पण त्याच वेळी, राज्यात घडून येत असलेल्या बदलांच्या काही सूक्ष्म प्रवाहांचे सूचनही ती आकडेवारी आपल्याला घडवते. या आकडेवारीनुसार, वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगाराच्या केंद्रीकरणात असलेला मुंबई जिल्ह्याचा टक्का २००५ सालानंतर घसरलेला दिसतो. तर, पुणे व नाशिक या दोन जिल्ह्यांचा या संदर्भातील पूर्वीच चांगला लक्षणीय असलेला टक्का अलीकडील काळात अधिकच वधारलेला दिसतो. आर्थिक गणनेच्या आकडेवारीनुसार राज्यातील वस्तुनिर्माण उद्योगांतील एकंदर रोजगारापैकी २० ते २५ टक्के रोजगार २००५ साली मुंबईमध्ये एकवटलेला होता. २०१० सालातील या नमुना सर्वेक्षणानुसार तोच टक्का घसरून १० ते २० टक्क्यांदरम्यान आलेला दिसतो. हे सगळेच कल अधिक खोलात जाऊन अभ्यासणे ही म्हणूनच रोचक बाब ठरते. ■■

# मरणात जग जगते....

मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते
अद्य वाऽब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः

असे भागवतात म्हटले आहे. - 'हे वीरा, ज्यांनी जन्म घेतला, त्यांच्या देहाबरोबरच मृत्यूही उत्पन्न होत असतो. आज असो किंवा शंभर वर्षांनी असो, प्राण्यांना मृत्यू हा निश्चित आहे' हा या वचनाचा अर्थ. म्हणजे, जन्म आणि मृत्यू यांचा प्रवास एकाच क्षणापासून चालू होत असतो, असेही म्हणता येईल. काहींच्या मते शरीराचा नाश म्हणजे मृत्यू तर काहींच्या मते शरीर आणि प्राण (आत्मतत्त्व) यांच्या वियोगाला मृत्यू म्हणतात. आत्मा आहे की नाही, मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते, मृत्यूनंतरचे जीवन असते की नसते यांपैकी कोणत्याही चर्चेत न जाता मृत्यूनंतर जीवन/शरीराचे अस्तित्व संपते हे लक्षात घेणे अधिक महत्त्वाचे. आजघडीला मृत्यूविषयक मंथन करणे गरजेचे ठरते आहे ते Euthanasiaच्या संकल्पनेमुळे. जागतिक पातळीवर व भारतातही ही चर्चा चालू आहे. 'Euthanasia म्हणजे काय' इथपासून ही चर्चा चालू होते. आजारी व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेणे बंधनकारक असावे का, उपचार घेत जगण्याची सक्ती का असावी, Euthanasiaविषयी कायदा असावा की नसावा, कायदा करायचा झाल्यास तो कसा असावा, त्याचा वापर कोणी, केव्हा करावा असे अनेक प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहेत. Euthanasia ची चर्चा फार उद्बोधक आहे. मराठीत Euthanasia बाबत 'दयामरण' व 'स्वेच्छामरण' हे शब्द समानार्थी वापरले जातात. कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी 'मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' अशा सुरेख काव्यपंक्ती लिहिल्या असल्या तरी त्यांची क्षमा मागून 'मरण कल्पनेशी सुरु तर्क जाणत्याचा' असे आता म्हणता येईल, इतका हा विषय व ही चर्चा महत्त्वाची ठरते आहे. एकाप्रकारे 'मरणात (म्हणजे मरणाच्या चर्चेत) जग जगते आहे!' २०१४ या वर्षातील या शेवटच्या अंकात याचाच ऊहापोह मांडला आहे.



# मरण कल्पनेशी सुरू तर्क...

इंग्रजी शब्दकोशात Euthanasia = Mercy killing असा शब्द आहे. Euthanasia हा शब्द ग्रीक भाषेतून इंग्रजी भाषेत आला. Eu म्हणजे चांगले आणि thanatos = Death म्हणजे चांगला मृत्यू. ऑगस्ट्स् राजाने शरीराला वेदना होऊ नयेत यासाठी मरण स्वीकारले होते. तेव्हा त्या संदर्भात इतिहासतज्ज्ञ Suetonius यांनी हा शब्द प्रथम वापरला होता. Euthanasia म्हणजे असाध्य व वेदनादायी आजार असताना रुग्णाला वेदना होणार नाहीत अशाप्रकारे त्याचा मृत्यू घडवून आणणे. Euthanasiaचे दोन प्रकार आहेत. डॉक्टरांच्या विशिष्ट कृतीमुळे/हस्तक्षेपामुळे रुग्णाचा मृत्यू घडून येणे म्हणजे 'ॲक्टिव्ह' euthanasia होय. तर, रुग्ण असाध्य रोगाने आजारी असताना वैद्यकीय उपचार थांबवणे, जीवनरक्षक साधनांचा वापर न करणे वा चालू असल्यास तो थांबवणे हा 'पॅसिव्ह' euthanasia होय (भारतात या दोन्हीला कायदेशीर मान्यता नाही पण 'पॅसिव्ह' Euthanasia ला न्यायालयाचा आक्षेपही नाही).

'पॅसिव्ह' euthanasiaबाबतचा निर्णय स्वतः घेऊन वैद्यकीय उपचार चालू न करण्याची वा चालू असलेले उपचार थांबवण्याची विनंती रुग्णाने स्वतः वैद्यकीय तज्ज्ञांना व जवळच्या नातेवाईकांना करणे म्हणजे रुग्णाच्या संमतीने घडून येणारा मृत्यू - voluntary euthanasia - होय. उपचारांबाबत निर्णय घेण्याच्या परिस्थितीत नसलेल्या/कोमात असलेल्या रुग्णावरील उपचार (त्याच्या परवानगीशिवाय) त्याच्या जवळच्या नातेवाईकांनी व वैद्यकीय तज्ज्ञांनी परस्परसंमंतीने थांबवणे व रुग्णाचा नैसर्गिक मृत्यू होऊदेणे म्हणजे non-voluntary euthanasia होय. या शिवाय 'सन्मानपूर्वक मरणाचा हक्क' (Right to Die with Dignity) असाही एक प्रकार आहे. त्यात असाध्य रोगाने ग्रासलेल्या व तीव्र वेदना भोगणा-या रुग्णाला विशिष्ट अटींचे कायदेशीर मार्गाने पालन करून व वैद्यकीय परवानगी मिळवून प्राणघातक औषधांचे सेवन स्वहस्ते करून आपल्या आयुष्याचा शेवट घडवून आणता येतो. मराठीत 'पॅसिव्ह' euthanasia बाबत 'दयामरण' व 'स्वेच्छामरण' हे शब्द समानार्थी असे वापरले जातात.

‘ॲक्टिव्ह’ euthanasia आणि ‘पॅसिव्ह’ non-voluntary euthanasia या कृती ‘दयामरण’ या संकल्पेनशी सुसंगत आहेत. तर voluntary euthanasia बाबतचा निर्णय वा ‘सन्मानपूर्वक मरणाचा हक्क’ रुग्णाने स्वतः घेतला असल्याने ते ‘स्वेच्छामरण’ म्हणता येईल. तथापि, या विषयाची चर्चा करताना euthanasia हाच शब्द वापरण्यात आला असून त्या संदर्भात ज्या देशांनी जे शब्दप्रयोग केले आहेत ते तसेच देण्यात आले आहेत. Euthanasia ची चर्चा चालू होण्यामागे माणसांचे वाढलेले सरासरी आयुर्मान आणि विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती ही दोन मोठी कारणे आहेत. अलीकडच्या काळात सर्वसामान्य नागरिक आरोग्याबाबत ब-याच प्रमाणात जागरुक झालेले आहेत. त्यातच नवनवीन औषधे, आरोग्यसेवेतील सुधारणा, नवनवीन उपकरणे, साधने यांमुळे अनेक आजारांवर मात करणे आणि मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार अशा व्याधी आटोक्यात ठेवणे शक्य बनले आहे. व्हेन्टिलेटर, हार्ट-लंग मशिन, पोटात नळी घालून त्याद्वारे अन्न देण्याची सुविधा या बाबी आता परिचयाच्या झाल्या आहेत. त्यामुळे आजारपण दूर होण्यासाठी बराच काळ लागला तरी रुग्णाचा जीव वाचविण्याचे (किंवा मृत्यू पुढे ढकलण्याचे) प्रयत्न करता येतात.

असे असले तरी अनेक असाध्य आजार पूर्णपणे बरे करणे शक्य नसते. शिवाय सर्व उपचारांनंतरही रुग्णाची शारीरिक स्थिती सर्वार्थाने चांगली राहील याची खात्री नसते. रुग्णाच्या शरीराचा प्रतिसाद कसकसा मिळेल ते पाहून पुढील उपचार करावे की न करावे असा प्रश्न वैद्यकीय तज्ज्ञांपुढे उभा ठाकत असतो. शिवाय या सर्व बाबींवर किती खर्च करण्याची रुग्णाची व त्याच्या नातेवाईकांची तयारी आहे याचाही विचार सर्व संबंधितांना करणे भाग पडते. अशा नानाविध कारणांमुळे उपचार करण्यावरही काही बंधने येऊ शकतात. या शिवाय, रुग्णाला हे सर्व उपचार स्वतःवर करवून घ्यायचे आहेत किंवा नाहीत, त्या प्रक्रियेत होणारा शारीरिक व मानसिक त्रास त्याला सोसायचा आहे किंवा नाही याचाही विचार होणे अपेक्षित आहे. वयोवृद्ध व असाध्य रोगाने ग्रासलेल्या, वेदनेने तळमळणा-या आणि कधी विविध प्रकारे विकलांग होणा-या रुग्णांना या सर्व उपचारांपेक्षा मृत्यू बरा असे वाटू शकते. Euthanasiaची चर्चा इथे चालू होते.



म्हणजे, उपचारांनंतरही मृत्यू टाळता येणार नाही किंबहुना उपचार करणे म्हणजे उंबरठ्यावर थांबलेल्या मृत्यूला कसेबसे तिथेच थोपवणे व मृत्यूची घटिका लांबवणे अशा जीवनाच्या अखेरच्या टप्प्यावर (वैद्यकीय भाषेत - Terminally ill) असणा-या रुग्णांच्या संदर्भात euthanasiaची चर्चा जोर धरते. तसेच, कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात कोणत्याही टप्प्यावर अपघाताने वा अन्य कारणाने अशी वेळ आली तर त्या व्यक्तीला euthanasiaचा अधिकार असावा की नसावा, हा प्रश्नही इथे उपस्थित होतो व तो महत्त्वाचा ठरतो. बहुतांश देशांमध्ये ‘पॅसिव्ह’ euthanasia ची चर्चा आहे आणि ‘ॲक्टिव्ह’ euthanasia बेकायदेशीर आहे, ही बाब इथे प्रथम लक्षात घेतली पाहिजे. (‘ॲक्टिव्ह’ euthanasiaपेक्षा) काही ठिकाणी ‘सन्मानपूर्वक मरणाचा हक्क’ (Right to Die with Dignity) असा मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे (त्याचे विवेचन पुढील लेखात आहे).

काही रुग्ण Terminally ill या टप्प्यावर नसतात मात्र अपघाताने वा अन्य काही कारणांमुळे त्यांचा मेंदू योग्य प्रकारे कार्य करू शकत नाही. त्यांना सभोवतालचे व शारीरिक भान नसते. असे रुग्ण कोमात असतात किंवा त्या सीमारेषेवर असतात. अशा रुग्णांची स्थिती वैद्यकीय भाषेत persistent and irreversible vegetative condition अशा शब्दांत सांगितली जाते. अशा रुग्णांना जिवंत राहण्यासाठी व्हेन्टिलेटर वा अन्य यंत्र लागतेच असे नाही. अन्ननळी पोटात घालून वा कधी ती न घालताही थेट मुखातून पातळ पदार्थ देऊन त्यांची योग्य शुश्रुषा घेत त्यांना जगवणे शक्य असते. अशा रुग्णांच्या अस्तित्वाला काही अर्थ नसतो पण हृदयक्रिया चालू असल्याने ते जिवंत असतात. अशा रुग्णांसंदर्भातही euthanasia चा मार्ग असावा असे म्हटले जाते. पण अशा रुग्णांबाबत euthanasiaचा निर्णय कोणी घ्यायचा, असा प्रश्न उपस्थित होतो. रुग्णाचे जवळचे नातेवाईक व वैद्यकीय तज्ज्ञ यांनी परस्परसंमंतीने असा निर्णय घेणे अपेक्षित असते. या संदर्भात भारतात अरुणा शानभागबाबत न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या खटल्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. किंबहुना, अलीकडच्या काळात भारतातील euthanasia ची (दयामरण व स्वेच्छामरण या दोन्हींची) चर्चा या खटल्यानंतर अधिक प्रमाणात होऊ लागल्याचे दिसते.

अरु णा शानभाग खटल्याबाबत बरेच काही लिहिले-बोलले गेले आहे. त्याचा ऊ हापोह करण्याचे येथे प्रयोजन नाही. पण त्या निमित्ताने न्यायालयाने मांडलेला मुद्दा इथे विचारात घ्यावा लागतो. गेल्या तीन दशकांपासून अरु णा शानभाग persistent and irreversible vegetative condition या स्थितीत मुंबईतील केईएम रु ग्णालयात आहे. रु ग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञ व इतर कर्मचारी वर्ग यांच्या अखंड सेवेमुळे अरू णा शानबाग जिवंत आहे. तिचे जवळचे नातेवाईक तिची सेवाशुश्रुषा करीत नाहीत व तिला भेटण्यासही येत नाहीत. तिच्या स्थितीचा विचार करू न तिचे अस्तित्वहीन जगणे संपवावे अशी विनंती तिच्यावर पुस्तक लिहिणा-या व तिची मैत्रीण म्हणवणा-या पत्रकार महिलेने सर्वोच्च न्यायालयापुढे केली. तिचे जीवन संपविण्याचा अधिकार तिच्या वतीने तिच्या मैत्रिणीला नाही व केईएम रु ग्णालय अरु णाची योग्य काळजी घेत आहे, असे केईएम रु ग्णालयाकडून त्या नंतर न्यायालयात सांगण्यात आले. सर्व बाबींचा विचार करू न सर्वोच्च न्यायालयाने केईएम रु ग्णालयाचे म्हणणे उचित ठरवले. पण त्याच वेळी 'पॅसिव्ह' euthanasiaबाबत काही मार्गदर्शक बाबी सर्वोच्च न्यायालयाने मांडल्या. अरु णा शानभागबाबत केईएम रु ग्णालयाचे मत बदलले तर केईएम रु ग्णालयाला त्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुढील कृती करता येईल. सर्वसामान्य नागरिकांसाठीही तीच प्रक्रिया लागू होते (मात्र, भारतात असा कायदा नाही, त्याचा ऊ हापोह पुढील लेखात आहे).

Euthanasia संदर्भात वैद्यकीय तज्ज्ञांसमोर नैतिकतेचा प्रश्न दोन बाजूंनी उभा ठाकतो. प्रयत्नाची अथक पराकाष्ठा करून रु ग्णाला जीवनदान देणे हे तज्ज्ञांचे प्राथमिक व नैतिक कर्तव्य आहे. तर दुसरीकडे, असाध्य आजार असल्याने रु ग्णावर उपचार करणे व्यर्थ आहे, किंबहुना उपचार केल्याने रु ग्णाला अधिक शारीरिक त्रास होऊ शकतो अशी काही रु ग्णांची स्थिती असते. अशा वेळी त्यांच्यावर फारसे काही उपचार न करता त्याची वाटचाल अप्रत्यक्षरीत्या 'पॅसिव्ह' euthanasia च्या दिशेने होऊ द्यावी का, अशा पेचात तज्ज्ञ अडकतात. अर्थात, अशा परिस्थितीत जगभरात व भारतातही व्यवहारात 'पॅसिव्ह' euthanasia चा अवलंब होताना दिसतो. म्हणून euthanasia ला कायद्याचे पाठबळ मिळावे अशी चर्चा आहे. ■■



## इतिहासातील पानांमधून....

● *स्वतःचे जीवन संपविण्यासाठी प्रायोपवेशनाचा मार्ग भारतीय संस्कृतीत आहे. हे एक व्रत मानले जाते. अन्नपाणी वर्ज्य करू न म्हणजे निराहार राहून मृत्यू घडेपर्यंत राहणे म्हणजे प्रायोपवेशन होय. यात सर्व कर्मसंन्यासपूर्वक आहारत्याग करू न मृत्यूला निमंत्रण द्यायचे असते. परीक्षिती राजाने प्रायोपवेशन करू न मृत्यू पत्करला अशी कथा भागवतात आहे. जैनांमध्ये ही प्रायोपवेशनाची प्रथा अजून चालू आहे. तिला ते सल्लेखना असे म्हणतात. आचार्य विनोबा भावे यांनी प्रायोपवेशनाचा मार्ग स्वीकारला होता.*

● *कोणत्याही कारणासाठी केलेली आत्महत्या हा भारतीय राज्यघटनेने दंडनीय अपराध ठरवला आहे. भारतीय संस्कृतीत आत्महत्याविषयक चर्चा संन्याशांबाबत करण्यात आली आहे. जाबाल व कठश्रुती या उत्तरकालीन उपनिषदांत आत्मज्ञान झालेल्या संन्याशाने अग्निप्रवेश, जलप्रवेश, उपवास इत्यादी मार्गांनी देहत्याग करण्यास हरकत नाही, असे म्हणण्यात आले आहे. संन्याशाने हळूहळू अन्न कमी करू न केवळ जलपान व वायुभक्षण करावे असे आपस्तंब धर्मसूत्रात सांगितले आहे.*

● *स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी आत्महत्या व आत्मसमर्पण यांतील सूक्ष्म भेद स्पष्ट केला होता. तो असा - अत्यंत असमाधानाने, विफलतेच्या तीव्र जाणिवेने, संकटांना कंटाळून वैतागाच्या भरात जे जीव देतात त्या कृत्याला आत्महत्या म्हटले जाते. परंतु आपले जीवितकार्य, जीवनाचे ध्येय, हेतू पूर्णपणे सफल झालेला आहे अशा कृतकृत्यतेच्या भावनेने जे आपल्या ऐहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात त्यांच्या कृत्यास आत्मसमर्पण असे म्हणतात.*

*(संदर्भ - भारतीय संस्कृतिकोश, संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी, खंड १, पृष्ठ ४१६-४१७, खंड ५ पृष्ठ ७५३, खंड ७ ४७४-४७५).*

# ....अर्क कायद्याचा

लोकशाही तत्त्वांचे खंदे पुरस्कर्ते असलेले ब्रिटिश तत्त्वज्ञ व अर्थशास्त्रज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांनी लोकशाहीसंदर्भात एक मूलभूत तत्त्व मांडून ठेवले आहे. नागरी समाजातील एखादी व्यक्ती वा गटसमूह दुस-या व्यक्तीला वा गटसमूहांना शारीरिक हानी पोहचवत असेल तरच त्यांच्या संदर्भात (शासनाने) त्यांच्या इच्छेविरुद्ध बळाचा वापर करावा (अन्यथा नाही), अशा आशयाचे ते तत्त्व आहे. कोणाच्याही विरोधात बळाचा वापर करताना अन्य नागरिकांना होणारी शारीरिक हानी थांबवणे, हा एकमेव हेतू असावा असे त्यांनी सूचित केले आहे. त्यामुळे हत्या, खून, दरोडे रोखण्यासाठी वा तशी कृती करणा-या अपराध्यांसाठी लोकशाही सरकारे कायदे करू शकतात. पण जर कुणाचे शारीरिक नुकसान होत नसेल तर नागरिकांच्या वैयक्तिक जीवनातील अधिकारांवर गदा येईल असे कायदे लोकशाही सरकारांनी करण्याचे प्रयोजन नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. जॉन स्टुअर्ट मिल यांच्या या भूमिकेचा आधार घेऊन euthanasia हा नागरिकांचा वैयक्तिक अधिकार व बाब आहे; तसेच, त्यामुळे अन्य कोणाचे शारीरिक नुकसान होत नाही म्हणून euthanasia चा कायदा करण्यात यावा असे आग्रही मत euthanasiaचे समर्थक मांडतात.

'आपल्या शरीरावर आपला स्वतःचा नाही तर कोणाचा अधिकार आहे' असा प्रश्न उपस्थित करून कॅनडातील Sue Rodriguez या महिलेने euthanasiaचा कायदेशीर हक्क मिळावा म्हणून कॅनडातील सर्वोच्च न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. १९९४ मध्ये तिचा मृत्यू होण्यापूर्वीची ही घटना होती. या संदर्भात पाश्चात्य देशांमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याची चर्चा महत्त्वाची ठरते. दुर्धर आजार झाल्यानंतर वेदनामय आयुष्य जगून मृत्यूला कवटाळण्यापेक्षा voluntary euthanasiaची व non-voluntary euthanasiaची मागणी तिथे जोर धरताना दिसते. तरीदेखील सर्व पाश्चात्य देशांनी या बाबतचा कायदा केलेला नाही हे इथे नोंदले पाहिजे.



लोकशाही तत्त्वे व व्यक्तीचे वैयक्तिक अधिकार हे मुद्दे लक्षात घेऊन काही देशांनी euthanasia चा कायदा मंजूर केला आहे. तर काही देशांमध्ये 'पॅसिव्ह' euthanasia व palliative care/sedation याला प्राधान्य देण्यात येत आहे. Palliative care/sedation यांत थोडा फरक आहे. Palliative care मध्ये फक्त वेदना कमी करणारी औषधे दिली जातात व अन्य औषधोपचार थांबवले जातात. पण गुंगीचे औषध मात्र दिले जात नाही. रुग्णाला अन्न, पाणी घ्यावेसे वाटले व ते घेण्याइतपत त्याची शारीरिक स्थिती असेल तर ते दिले जाते. Palliative sedation म्हणजे रुग्णाचे औषधोपचार पूर्णपणे थांबवून त्यांना गुंगीचे औषध देऊन झोपवले जाते. त्यांना अन्न, पाणी दिले जात नाही. कधी कधी Palliative care व sedation हे दोन्ही पर्याय एकत्रितरीत्याही वापरले जाऊ शकतात. म्हणजे, गुंगीचे औषध देऊन रुग्णाला झोपवून ठेवायचे पण औषधाचा दुसरा डोस पोटात जाण्याआधी रुग्णाने मागितल्यास त्याला अन्न/द्रवपदार्थ द्यायचे. तसे पाहता Palliative sedation हा Palliative care चाच एक भाग आहे. अर्थात, या दोन्ही मार्गांचा अवलंब रुग्णालयांमध्येच केला जावा, असेही साधारणपणे म्हटले जाते.

**नेदरलँड्स्**

Euthanasia कायदा मंजूर करणारा जगातील पहिला देश आहे नेदरलँड्स्. एप्रिल २००२ मध्ये नेदरलँड्स्ने euthanasia आणि assisted suicide याला मान्यता दिली. मात्र यासाठी काही अटी/नियम आहेत. रुग्णाला असाध्य आजार असेल आणि त्याला तीव्र वेदना सहन कराव्या लागत असतील तरच त्याने स्वतःहून सजगपणे, पूर्ण विचारांती euthanasiaची मागणी केली पाहिजे. अशा रुग्णांना वैद्यकीय तज्ज्ञांच्या मदतीने प्राणघातक औषध सेवन करण्याची परवानगी दिली जाते. २०१० मध्ये तिथे ३,१३६ रुग्णांनी euthanasia चा मार्ग स्वीकारला होता. या शिवाय तेथे 'पॅसिव्ह' euthanasia किंवा Palliative care/sedation हा पर्याय अनेक रुग्णालयांमध्ये मान्य झालेला दिसतो. २००५ पासून तेथे दरवर्षी किमान १५ हजार रुग्णां-बाबत हा मार्ग स्वीकारला जातो, असे 'रॉयल डच मेडिकल असोसिएशन'ने नमूद केले आहे.

नेदरलँड्स्ने हा कायदा केला तेव्हा तेथेही या विषयावर व विशेषतः assisted suicide यावर वादग्रस्त चर्चा झाली. रुग्णाचा आजार असाध्य असेल आणि त्याला तीव्र वेदना सहन कराव्या लागत असतील तरच वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णाला प्राणघातक औषधे सेवन करण्याची परवानगी देऊ शकतात. अन्यथा वैद्यकीय तज्ज्ञांसाठीही तो मनुष्यवध (homicide) ठरतो. त्यामुळे वैद्यकीय तज्ज्ञांना सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता काटेकोरपणे करावी लागते. या संदर्भात रुग्णांना माहिती देणा-या काही संस्था तेथे आहेत. Assisted suicide बाबत कायदेशीर माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणा-या नागरिकांपैकी १० ते १५ टक्के नागरिक आत्महत्या करतात, असे काही तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

**बेल्जियम**

Euthanasia चा कायदा मंजूर करण्यात बेल्जियम दुस-या क्रमांकावर आहे. रुग्णाचा आजार असाध्य असेल आणि त्याला तीव्र वेदना सहन कराव्या लागत असतील तर त्याला आपले जीवन संपविण्याचा अधिकार आहे आणि यासाठी तेथील वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णाला मदत करू शकतात. परंतु, रुग्णाने आपले जीवन कसे संपवावे त्यांबाबत मात्र संबंधित कायद्यात काहीच नमूद केलेले नाही. मात्र, रुग्णाच्या अखरेच्या श्वासापर्यंत वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णाजवळ थांबणे अपेक्षित आहे. या शिवाय, आपली शारीरिक व मानसिक स्थिती चांगली असताना (म्हणजे कोमा वा persistent and irreversible vegetative condition यांत जाण्यापूर्वी) एखाद्या व्यक्तीने euthanasia ची इच्छा कागदोपत्री नमूद केलेली असेल तर त्या व्यक्तीला euthanasiaचा अधिकार मिळू शकतो. शारीरिक व मानसिक स्थिती चांगली असताना असे वैद्यकीय इच्छापत्र (याला living will असेही म्हणतात) लिहून ठेवण्याबाबतही अनेक देशांमध्ये चर्चा आहे. Assisted suicide असे बेल्जियममधील कायद्यात नमूद करण्यात आलेले नाही. २०१३ मध्ये बेल्जियममध्ये euthanasia च्या १८०७ घटना घडल्याचे नोंदविण्यात आले आहे. २०१२ मध्ये ही संख्या १४३२, २००८ मध्ये ७०८ आणि २००३ मध्ये २०३ अशी होती. यावरून euthanasia चा मार्ग स्वीकारणा-यांच्या संख्येत बेल्जियममध्ये हळूहळू वाढ होते आहे असे दिसते.



बेल्जियममध्ये दोन वेगळ्या घटनांमध्येही euthanasia चा अधिकार देण्यात आला होता. लिंगबदलाची शस्त्रक्रिया केल्यानंतर काही विपरीत घडल्यामुळे आपले पुढील आयुष्य अतिशय भीषण परिस्थितीत जाऊ शकते, हे लक्षात आल्यानंतर त्या व्यक्तीने euthanasia ची इच्छा व्यक्त केली व त्या व्यक्तीला euthanasia चा अधिकार देण्यात आला होता. दुस-या घटनेत दोन जुळी भावंडे होती, ती ठार बहिरी होती. काही कारणाने त्या दोघांनाही अंधत्व येणार हे वैद्यकीय चाचणीतून स्पष्ट झाल्यानंतर अंधत्व व बहिरत्व घेऊन जगण्याचे प्रयोजन त्यांना वाटले नाही आणि त्यांनी euthanasia चा अधिकार मागितला. तो त्यांना देण्यात आला होता. पण बोटावर मोजता येणा-याच अशा या घटना आहेत.

euthanasia ची सर्व चर्चा स्वाभाविकपणे प्रौढ नागरिकांच्या संदर्भात केली जाते. पण बेल्जियमने १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलामुलींसाठीही euthanasia चा मार्ग खुला ठेवला आहे. थोडी जाणती झालेली मानसिकदृष्ट्या सक्षम मुलेमुली असाध्य रोगाने ग्रस्त असतील, असह्य वेदना त्यांना सहन कराव्या लागत असतील आणि त्यांच्या आजारांवर कोणतेही उपचार शक्य नसतील तर आपल्या पालकांच्या संमतीने अशा मुलांना euthanasiaचा पर्याय स्वीकारता येतो.

**जर्मनी आणि स्वित्झर्लंड**

जर्मन भाषा बोलणा-या देशांमध्ये euthanasia हा शब्द साधारणपणे वापरला जात नाही. तेथे assisted suicide आणि active assisted suicide असे शब्दप्रयोग केले जातात. जर्मनी आणि स्वित्झर्लंड येथे वैद्यकीय तज्ज्ञांनी प्राणघातक औषधे रुग्णाला लिहून देणे वा प्राणघातक औषधे थेट रुग्णाला देणे म्हणजे active assisted suicide हे बेकायदेशीर आहे. पण रुग्णाने कोणाच्याही मदतीशिवाय स्वतः प्राणघातक औषधे घेतली तर त्याला assisted suicide असे म्हटले जाते आणि ते बेकायदेशीर कृत्य ठरत नाही. स्वित्झर्लंडमध्ये या संदर्भातील कायदा थोडा वेगळा आहे. जर एखाद्या व्यक्तीचा आत्महत्येचा हेतू नसेल तर तेथे assisted suicide ला मान्यता आहे. रुग्णाला assisted suicide बाबतची माहिती देणा-या Dignitas व Exit अशा संस्थाही तेथे आहेत.

अशा संस्थांच्या कार्याबाबत सरकारची नेमकी भूमिका काय आहे ते स्पष्ट होऊ शकलेले नाही. Active assisted suicide ला जर्मनीतील काही नागरिकांचा पाठिंबा असल्याचे काही सर्वेक्षणांवरून आढळते. पण जर्मनीतील सरकार त्याबाबत कृती करण्याच्या बाजूने नाही. उलट assisted suicide बाबत अधिक कडक भूमिका घेण्याचा विचार सरकार करीत असल्याचे म्हटले जाते. स्वित्झर्लंडमध्ये रुग्णांना माहिती देण्याचे कार्य करणा-या संस्थांवर जर्मनीत बंदी घालण्यात येईल असे सरकारी सूत्रांकडून सांगण्यात येते.

**अमेरिका**

संपूर्ण अमेरिकेत euthanasia बाबत एकच असा कायदा नाही. तेथील काही प्रांतांनी मात्र euthanasiaच्या बाजूने कायदा केला आहे. ओरेगॉन प्रांताने या संदर्भात १९९७ मध्ये प्रथम पाऊल उचलले. मात्र, तेथे euthanasia/assisted suicide/active assisted suicide असे शब्द वापरण्यात आलेले नाहीत. नागरिकांची euthanasia ची गरज तसेच रुग्णाने स्वतःहून जीवन संपविणे ही त्याची व्यक्तीगत बाब आहे, हे लक्षात घेऊन 'सन्मानपूर्वक मरणाचा हक्क' (Right to Die with Dignity) तिथे मंजूर करण्यात आला आहे. त्या कायद्यानुसार ओरेगॉन येथील रहिवासी असणारी व्यक्ती दुर्धर रोगाने ग्रस्त असेल, रोगामुळे त्याचे आयुष्य सहा महिने वा त्यापेक्षा कमी असेल आणि रुग्ण मानसिकदृष्ट्या सक्षम असेल तर त्या रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय तज्ज्ञांच्या शिफारशीनुसार (prescription) प्राणघातक औषधे मिळू शकतात; मग त्यांचे सेवन करून त्याला मृत्यूला सामोरे जाता येते. औषधांचे सेवन करताना वैद्यकीय तज्ज्ञांची वा अन्य कोणाचीही मदत घेण्यास तेथे बंदी आहे. जवळच्या नातेवाईकांसोबत चर्चा करून त्यांच्यासमोर प्राणघातक औषधांचे सेवन ठाम निश्चयाने, जाणीवपूर्वक आणि शांत मनाने करण्याइतका रुग्ण मानसिकदृष्ट्या सक्षम असणे तेथे महत्त्वाचे मानले गेले आहे (हा कायदा कसा आहे व त्याबाबत अलीकडेच घडलेल्या एका घटनेसंदर्भातील विवेचन पुढील लेखात करण्यात आले आहे). म्हणजे, active assisted suicide/ assisted suicide हा प्रकार तेथे नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.



ओरेगॉननंतर वॉशिंग्टन येथे याच धर्तीवर अशा प्रकारचा कायदा मंजूर करण्यात आला (२००९). या शिवाय, वरमॉन्ट, मॉन्टाना आणि न्यू मेक्सिको येथे साधारणतः अशाच प्रकारचे कायदे मंजूर करण्यात आले आहेत. अमेरिकेत २०१३ मध्ये दुर्धर रोगग्रस्त (Terminally ill) असलेल्या ३०० रुग्णांना त्यांच्या मागणीनुसार प्राणघातक औषधांचे prescription वैद्यकीय तज्ज्ञांकडून देण्यात आले होते. त्यांपैकी २३० रुग्णांनी त्या औषधांचे सेवन करून आपले जीवन संपवले. तर, अन्य रुग्णांनी प्राणघातक औषधे न सेवन करण्याचा निर्णय घेतला.

**कॅनडा**

Euthanasia/Physician assisted suicide (PAS) असा कायदा केला तर त्याचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता आहे, या मुद्याभोवतीच कॅनडामधील चर्चा प्रामुख्याने झाली. असा कायदा झाल्यास रुग्णांचे नातेवाईक वा त्यांची काळजी घेणारे अन्य कोणी रुग्णांवर दबाव आणून त्याला या कायद्याचा उपयोग करण्यास भाग पाडू शकतात याकडे लक्ष वेधण्यात आले. तसेच असा कायदा केल्यास दुर्धर रोगग्रस्त रुग्णांना उपलब्ध असणा-या palliative careचा दर्जा खालावेल अशी भीतीही तेथे व्यक्त करण्यात आली. या कायद्याला विरोध करणा-यांनी नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत रुग्णांची अधिक काळजी घेतली जावी अशी बाजू नेटाने मांडली होती. कॅनडात स्वेच्छामरणाचा कायदा आजपर्यंत करण्यात आलेला नाही.

**चीन**

Euthanasiaचा कायदा चीनमध्ये नाही. Euthanasia या शब्दाचा अर्थ चीनमध्ये दोन प्रकारे घेतला जातो. शांततापूर्ण, सुखी/समाधानी मृत्यू हा एक अर्थ होय; तर, वेदनारहित मृत्यू हा दुसरा अर्थ होय. वस्तुतः दुर्धर रोगग्रस्त व ज्यांचा अंतिम काळ समीप आला आहे अशा रुग्णावरील औषधोपचार थांबवण्याची अनौपचारिक पद्धत चीनमध्ये इतिहासकाळापासून होती. वैद्यकीय तज्ज्ञ व रुग्णाचे नातेवाईक यांनी परस्परसंमतीने असा निर्णय घेऊन रुग्णाच्या अंतिम इच्छा पूर्ण करण्याला तिथे महत्त्व दिले जात होते. आजही तिथे अशा नैसर्गिक मृत्यूला समाजमान्यता आहे. चीनमधील एका वैद्यकीय तज्ज्ञाने १९८६ मध्ये कर्करोगग्रस्त **(पृष्ठ ३६ वर पाहावे)**

# सन्मानपूर्वक मरण्याचा हक्क

*असे असावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर,*
*नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर,*

एका कवीच्या या काव्यपंक्तीत थोडासा बदल केला आणि त्याच काव्यपंक्ती

*असे **मरावे** दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर,*
*नजर रोखूनी नजरेमध्ये, **मृत्यूलाही** द्यावे उत्तर*

अशा बदलल्या तर मृत्यूला धीटपणे, सामर्थ्यशील मनाने सामोरे जाण्याची इच्छा व्यक्त होते. या इच्छेचा तसेच वेदना सहन करत व विकलांग होऊन दुस-यावर अवलंबून न राहण्याच्या रुग्णाच्या इच्छेचा मान राखून 'सन्मानपूर्वक मरण्याचा हक्क' (Right to Die with Dignity) काही ठिकाणी मान्य करण्यात आला आहे. त्यानुसार प्राणघातक औषधांचे सेवन स्वहस्ते करून रुग्णाला मृत्यूला सामोरे जाता येते. अमेरिकेतील ओरेगॉन येथील असा कायदा (Death with Dignity Act - DWDA) पुढीलप्रमाणे आहे.

सन्मानपूर्वक मरणाचा हक्क मागणा-या रुग्णाची स्थिती खालील प्रमाणे असावी -

- रुग्ण प्रौढ असावा (वय किमान १८ वर्षे व त्यापेक्षा अधिक असावे).
- रुग्ण ओरेगॉनचा रहिवासी असावा.
- सक्षम असावा (म्हणजे आपल्या आरोग्यविषयक बाबींचा सर्वंकष विचार करून त्याबाबत निर्णय घेण्याइतका व ते सांगण्याइतका सक्षम असावा)
- आजाराचे योग्य निदान होऊन त्या आजारामुळे आपला सहा महिन्यांत मृत्यू होणार आहे (म्हणजे आपला आजार Terminally ill या प्रकारात आहे) ही बाब रुग्णाला निश्चितपणे स्पष्ट झालेली असली पाहिजे.

अशी Terminally ill ही स्थिती असणा-या रुग्णाला प्राणघातक औषधांचे सेवन करण्यासाठी लागणारी शिफारस (prescription) तज्ज्ञांकडून मिळण्यासाठी रुग्णाने (व वैद्यकीय तज्ज्ञांनी) पुढील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.



- आपल्या असाध्य आजारामुळे आपल्याला सन्मानपूर्वक मरण्याचा हक्क मिळावा अशी तोंडी मागणी रुग्णाने आपल्या डॉक्टरांकडे दोन वेळा केलेली असली पाहिजे. तसेच दोन वेळा केलेल्या या तोंडी मागण्यांमध्ये किमान १५ दिवसांचे अंतर असले पाहिजे.
- अशीच लेखी विनंती रुग्णाने डॉक्टरकडे दोन साक्षीदारांसमोर केलेली असावी.
- प्राणघातक औषधांचे सेवन करण्याबाबतची शिफारस संबंधित वैद्यकीय तज्ज्ञाने देण्याआधी त्या तज्ज्ञाने तसेच रुग्णाचे अन्य सल्लागार तज्ज्ञ या दोन तज्ज्ञांनी रुग्णाच्या आजाराबाबतचे निदान (diagnosis) व आजाराचे संभाव्य चढउतार (prognosis) यांबाबत निश्चितपणे स्पष्टता केली पाहिजे.
- रुग्ण सक्षम (म्हणजे आपल्या आरोग्यविषयक बाबींचा सर्वंकष विचार करून त्याबाबत निर्णय घेण्याइतका व ते सांगण्याइतका सक्षम) आहे किवा कसे ही बाब दोन्ही वैद्यकीय तज्ज्ञांनी तपासून त्या बाबत स्पष्टता केली पाहिजे.
- रुग्णाचा निर्णय हा मानसिक संतुलन ढासळून वा निराशेच्या, वैतागाच्या भावनेतून नाही याची खात्री संबंधित तज्ज्ञांनी करून घेणे गरजेचे आहे. या संदर्भात थोडीही शंका आल्यास संबंधित तज्ज्ञांनी त्या रुग्णाला मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठवण्याचा निर्णय घ्यावा.
- प्राणघातक औषधांचे सेवन करण्यासाठी त्या औषधांची चिठ्ठी देण्याआधी वेदनाशामक औषधे, रुग्णाला मिळू शकणारी palliative care/sedation इत्यादी बाबींची सर्व चर्चा वैद्यकीय तज्ज्ञाने रुग्णाबरोबर केली पाहिजे. या सर्व बाबींची माहिती रुग्णाला दिली गेली पाहिजे.
- प्राणघातक औषधांची चिठ्ठी देणा-या वैद्यकीय तज्ज्ञाने औषधांच्या चिठ्ठीवर त्या रुग्णाच्या अगदी जवळच्या नातेवाईकाचे नाव लिहून ठेवण्याची विनंती रुग्णाकडे केलीच पाहिजे (पण नातेवाईकाचे नाव तिथे असलेच पाहिजे ही बाब बंधनकारक नाही).

या कायद्यानुसार वैद्यकीय तज्ज्ञांनी रुग्णाला लिहून दिलेल्या प्राणघातक औषधांची नावे ओरेगॉन येथील 'डिपार्टमेन्ट ऑफ ह्यूमन सर्व्हिसेस'ला (DHS) कळवणे बंधनकारक आहे.

अशा प्राणघातक औषधांचा उपयोग कोण, कशासाठी करणार आहे याची माहिती औषधविक्रेत्यालाही असली पाहिजे, असे कायद्यात म्हणण्यात आले आहे. या कायद्याचा उपयोग करणा-या रुग्णाच्या आरोग्य व विमाविषयक सवलत/लाभ इत्यादींवर कोणताही परिणाम होणार नाही आणि असा रुग्ण हा कोणत्याही प्रकारे दोषी ठरत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच रुग्णाने या कायद्याचा अवलंब करणे म्हणजे 'आत्महत्या', 'मनुष्यवध' वा 'दयामरण' असेही म्हटले जाऊनये, असेही कायद्याने स्पष्टपणे नमूद केले आहे. ■■

## *नजर रोखूनी नजरेमध्ये, मृत्यूलाही द्यावे उत्तर*

*ब्रिटनी मेनार्ड ही २९ वर्षीय अमेरिकी महिला. तिच्या विवाहाला जेमतेम वर्ष झालेले. एकदा प्रचंड डोकेदुखीचा त्रास झाल्यानंतर केलेल्या तपासण्यानंतर तिला मेंदूचा कर्करोग झाल्याचे निदान झाले. हा कर्करोग चौथ्या व अंतिम टप्प्यातील होता. त्यावर कोणतेही औषधोपचार लागू पडणार नव्हते. तिच्या हाती केवळ सहा महिने होते. हे सहा महिनेही अतिशय वाईट परिस्थितीत, प्रचंड डोकेदुखीत आणि मेंदूचे एकेक कार्य बंद पडणा-या दिशेने जाणारेच होते. विकलांग व वेदनादायी सहा महिने अणि दररोजचे तिचे खालावणे हे तिच्यासाठी व तिच्या कुटुंबासाठी अतिशय त्रासदायक असेच होते. या सहा महिन्यांच्या काळात* palliative care/sedation *याचाही तिला उपयोग होणार नव्हता. अखेरीस कुटुंबियांशी सल्लामसलत करून संपूर्ण विचारांती तिने सन्मानपूर्वक मरण्याचा हक्क बजावण्याचा पर्याय स्वीकारला. त्यासाठी तिने व तिच्या पतीने कॅलिफोर्निया येथून ओरेगॉन येथे स्थलांतर केले. ओरेगॉनचे रहिवासी बनण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली. त्याचबरोबर तिला ज्या पर्यटनस्थळी भेट देण्याची इच्छा होती ती तिने पूर्ण केली. मग ओरेगॉनमधील कायद्यानुसार एकेक बाबीची पूर्तता करत ती अगदी अलीकडे नोव्हेंबर २०१४ मध्ये शांतपणे मृत्यूला सामोरी गेली. मृत्यूसमयी तिचे पती व आईवडील आणि जवळचे मित्रमैत्रिणी तिच्याजवळ होते. सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन तिने शांतपणे मृत्यूचा स्वीकार केला.*



**(पृष्ठ ३२ वरून)**

एका रुग्णाला मृत्यूघटिका समीप आणण्यासाठी मदत केली होती. त्या नंतर तेथे या विषयाची चर्चा चालू झाली. हृदयक्रिया बंद पडणे म्हणजे मृत्यू होणे असेच चीनमध्ये मानले जाते. अन्य देशांमधील वैद्यकशास्त्रात 'ब्रेनडेड' ही बाब मानली गेली आहे त्याबाबत चीनमध्ये स्पष्टता नाही. त्यामुळे 'ब्रेनडेड' या अवस्थेतील व्यक्तीचे काय करायचे असा पेच तेथील वैद्यकीय तज्ज्ञांसमोर नेहमीच उभा ठाकतो.

**भारत**

भारतात euthanasia ला कायदेशीर मान्यता नाही. मात्र, अरुणा शानभाग खटल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने 'पॅसिव्ह' euthanasia बाबत ऊहापोह केला आहे. त्यानुसार जी प्रौढ व्यक्ती आपल्यावर करावयाच्या वैद्यकीय उपचारांबाबतची संपूर्ण वैद्यकीय माहिती जाणून घेऊन स्वतः सर्वंकष विचार करण्यास शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असेल (competent patient) आणि आपला संपूर्ण विचारांती घेतलेला निर्णय वा इच्छा (informed decision) लिहून, बोलून वा खाणाखुणा करून स्पष्टपणे सांगू शकत असेल तर त्या व्यक्तीला तसे सांगण्याचा पूर्ण हक्क आहे आणि वैद्यकीय तज्ज्ञांवर/रुग्णालयांवर त्या रुग्णाचा निर्णय बंधनकारक असेल. अरुणा शानभाग वा तत्सम घटनांमध्ये म्हणजे रुग्णाची स्थिती persistent and irreversible vegetative condition अशी असेल आणि वरील प्रकारची वैद्यकीय इच्छा रुग्णाने कधी व्यक्त केलेली नसेल तर त्या व्यक्तीच्या आप्तस्वकीयांनी वैद्यकीय तज्ज्ञांशी सल्लामसलत करून त्या रुग्णाचे जीवन संपविण्याबाबत उच्च न्यायालयाकडून परवानगी घेतली पाहिजे. त्या वेळी वैद्यकीय तज्ज्ञांचे व रुग्णाच्या नातेवाईकांचे मत जाणून घेऊन रुग्णाचे हित लक्षात घेऊन उच्च न्यायालय निर्णय घेईल. तसेच वैद्यकीय सेवा नाकारणारे रुग्ण कोणत्याही प्रकारे दोषी ठरणार नाहीत. असे असले तरी वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते न्यायालयाची परवानगी न घेता 'पॅसिव्ह' euthanasia च्या अनेक घटना भारतात घडत आहेत; शिवाय, या संदर्भात विधेयकाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. याची दखल घेऊन सरकार कायदा करेल याची अपेक्षा करावी का? ■■

### प्रमुख संदर्भ

**(A) Books/Reports** - (1) J punjab Acad Forensic Med Toxicol 2014;14(1), Present status of Euthanasia in India from Medico-legal perspective - Thejaswi HT., Kumar A., Gupta SK.

(२) भारतीय संस्कृतिकोश, संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी, खंड १, पृष्ठ ४१६-४१७, खंड ५ पृष्ठ ७५३, खंड ७ ४७४-४७५.

**(C)Websites:** www.theguardian.com/society/2014/jul/17/euthanasia (2)www.ethicalrights.com/submissions/human-rights/83-the-right-to-die-with-dignity-euthanasia.html (3) http://oregon.gov/HDS/ph/pas/docs/year7.pdf (4)http://edition.cnn.com/2014/10/07



# Poverty in India

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## दुसरी आवृत्ती प्रकाशित

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

## ग्रंथालयातील पुस्तके

**अर्थचित्रे : लेखक - माधव दातार, प्रकाशक - द युनिक ॲकॅडमी, पुणे, सप्टेंबर २०१४, पृष्ठे -२०८, किंमत - १५० रूपये.**

चांगल्या दर्जाचे अर्थशास्त्रीय लेखन बहुशः इंग्रजी भाषेतील ग्रंथांच्या माध्यमातूनच वाचावयास मिळते. पायाशुद्ध, शास्त्रीय, व्यासंगी अभ्यासक-संशोधकांनी मेहेनतीने सिद्ध केलेले गुणवत्तापूर्ण असे अर्थशास्त्रविषयक लेखन मराठीमध्ये विपुल प्रमाणात सापडत नाही. त्यांतल्या त्यांत जे काही लेखन मराठी माध्यमभाषेतील पुस्तके अथवा नियतकालिकांमधून हाती येते त्यांतील अधिकांश लेखन हे अर्थशास्त्राचे विद्यार्थी, अध्यापक, अभ्यासक यांनाचा डोळ्यासमोर ठेवून शब्दबद्ध केलेले असते. सर्वसामान्य मराठी भाषिकांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेली अर्थसाक्षरतेची गरज व आवड ध्यानात घेता चांगल्या, दर्जेदार अर्थविषयक लेखनाची निर्मिती जबाबदारीच्या भावनेतून केली जाणे ही बाब आजघडीला अतिशय निकडीची बनलेली आहे. या पार्श्वभूमीवर, माधव दातार यांच्या अर्थतज्ज्ञविषयक लेखांचे संकलन असलेले हे पुस्तक महत्त्वाचे ठरते. अर्थशास्त्राच्या प्रांतात अत्यंत भरीव योगदान देणा-या एकंदर १६ अर्थतज्ज्ञांचे अर्थशास्त्रीय चिंतन-लेखन आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व यांचा नेटका परिचय सरळ, मोकळ्या मराठी भाषेमध्ये करून देणारे दातार यांचे हे पुस्तक अर्थशास्त्राच्या विद्यार्थी-अभ्यासकांइतकेच कोणाही वाचनप्रेमीला आस्वाद्य वाटेल असेच आहे. जोन रॉबिन्सन, निकोलस कॅल्डॉर, जोसेफ स्टिग्लिट्झ्, पॉल स्विझी, मिल्टन फ्रिडमन यांच्यासारख्या विख्यात पाश्चात्य अर्थवेत्यांच्या जोडीनेच चिंतामणराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ, पी. आर. ब्रह्मानंद, वि. म. दांडेकर, अशोक मित्र, स. ह. देशपांडे, कांता रणदिवे यांच्यासारख्या भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विचारविश्वाचा आलेख भाषेला बोजडपणा न येऊ देता मांडल्यामुळे अर्थशास्त्रासारख्या एका तांत्रिक विषयावरील हे पुस्तक कमालीचे वाचनसुलभ आणि त्यामुळे आल्हादक वाचनानुभव देते. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**